नि.फौ.ख.क्र.१४४/२०२५
सरकार वि. राजेंद्र
नि.क्र.१९.

सरकारतर्फे **साक्षदार क्रमांक ३** यांची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो कि

**नाव - सुशिलकुमार शालिकराम सोनवने, (मो.क्र.८२०८५४४२६८)**

वय - ३८ वर्ष, व्यवसाय – पोलीस उपनिरीक्षक,

राहणार – पोलीस स्टेशन अरोली, ता. मौदा, जिल्हा - नागपूर.

**सरतपास शपथेवर सरकारतर्फे सरकारी अभियोक्ता श्री. एस. जी. इंगळे यांच्यामार्फत -**

**१.** मी दिनांक २१.०७.२०२३ रोजी पासून पा.स्टे., अरोली येथे पो.उपनि. या पदावर कार्यरत आहे. दिनांक २९.१२.२०२४ रोजी मी, माझ्या पोलीस कर्मचाऱ्यांसह स्टेशन डायरी सा.न्हा. क्रमांक १६/२०२४ वेळ १८.१४ वाजता पो.स्टे., अरोली, अपराध क्रमांक ४०८/२०२४ चे तपासकामी मौजा तरोडी येथे शासकीय वाहनाने गेलो. तपास करून परत येत असताना मुखबिरद्वारे माहिती मिळाली की, मौजा शिवनी (भोंडकी), ता. रामटेक, नागपूर येथून एका ट्रॅक्टरमध्ये अवैधरित्या रेती भरून मौजा अडेगाव येथे आहे. अशा माहितीवरून लगेच आम्ही मौजा अडेगाव येथे पोहोचलो. अनिल उराडे यांच्या पानठेल्याजवळ दोन पंचांना बोलवून त्यांना घटनेची हकिकत समजावून सांगून मौजा अडेगाव येथे रेतीचा ट्रॅक्टर भरून वाहतूक करित आहे, त्यावर रेड करणेकामी आपण हजर रहावे अशी लेखी सुचना दिली. आता मला निशाणी क्र.८ वरील पंचांना दिलेले समंस दाखविण्यात आले. त्यावर माझी व पंचांच्या सह्या असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे.

**२.** थोड्या वेळाने सदर ठिकाणी सोनालीका कंपनीचा निळ्या रंगाचा रेतीने भरलेला विनाक्रमांकाचा ट्रॅक्टर आला. त्याला थांबवून त्याच्या चालकाला त्याचे नाव, गाव विचारले असता, त्याने त्याचे नाव राजेंद्र धरमदास धानकुटे असे सांगितले. सदर चालकास रेती वाहतुकीचा परवानाबद्दल, वाहनाच्या कागपत्राबद्दल विचारपूस केली असता, त्याच्याकडे परवाना व वाहनाचे कागदपत्र नसल्याचे त्याने सांगितले. सदर ठिकाणी आम्ही पंचांसमक्ष घटनास्थळ व जप्ती पंचनामा तयार केला. आता मला निशाणी क्र.९ वरील घटनास्थळ व जप्ती पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी व दोन पंचांची सही असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यानंतर उक्त ट्रॅक्टर व चालकास पो.स्टे., अरोली येथे घेवून आलो. त्यानंतर सदर ट्रॅक्टर चालक राजेंद्र धानकुटे व उक्त ट्रॅक्टरचा मालक त्याची पत्नी सुनंदा राजेंद्र धानकुटे यांच्याविरूध्द

लेखी फिर्याद दिली. आता मला सरदची फिर्याद दाखविण्यात आली. ती तीच असून त्यावर माझी सही आहे व त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. सदर फिर्यादला **निशाणी क्र.२०** देण्यात येत आहे. आता मला सरद फिर्यादिला अनुसरून तयार केलाला छापील प्रथम खबर अहवाल दाखविण्यात आला. तो तोच असून त्यावर माझी सही आहे व त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. सदर छापील प्रथम खबर अहवालला **निशाणी क्र.२१** देण्यात येत आहे. त्यानंतर उक्त विनाक्रमांकाचा ट्रॅक्टर, विनाक्रमांकाचा ट्रॉली व एक ब्रॅस रेती पो.स्टे., अरोली येथे जमा केली.

**३.** त्यानंतर मी आरोपी क्र.१ राजेंद्र याला अटक पंचनाम्याप्रमाणे अटक केली. आता मला सदरचा अटक पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी, दोन पंचांची व आरोपीची सही असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. सदर अटक पंचनाम्याला **निशाणी क्र.२२** देण्यात येत आहे. पुढील तपास पो.हवा. दत्ता बगमारे यांनी केला. आरोपींना बघितल्यास मी ओळखू शकतो. आरोपी आज न्यायालयात हजर आहेत.

**<u>सरतपास पूर्ण.</u>**

**<u>उलटतपास आरोपींतर्फे विद्वान वकिल श्रीमती एम. एम. तवर यांच्यामार्फत -</u>**

**४.** मी १६ वर्षांपासून पोलीस कर्मचारी आहे. हे म्हणणे खरे आहे की, रेती ही महसूल विभागाची असते. हे म्हणणे खरे नाही की, त्यासंबंधात महसूल विभागाचा एक स्वतंत्र उपविभाग आहे. हे म्हणणे खरे नाही की, रेती पकडण्याची कार्यवाई महसूल विभागामार्फत केली जाते.

**प्रश्न :** तुम्हाला महसूल विभागाने रेती कार्यवाई करण्याबाबत लेखी आदेश दिला नव्हता?

**उत्तर :** हे म्हणणे खरे आहे की, तसा आदेश आम्हाला दिला नव्हता. साक्षीदार स्वत:हून सांगतो की, आम्हाला तशा आदेशाची गरज नसते.

**५.** हे म्हणणे खरे आहे की, मी जप्त केलेल्या रेतीचे मोजमाप केले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, कुठल्याही वस्तूचे मोजमाप केल्या शिवाय त्याचे वजन सांगता येत नाही. साक्षीदार स्वत:हून सांगतो की, मोजमाप वस्तुवर अवलंबून आहे. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही रेती जप्त केली नव्हती म्हणून त्याचे मोजमाप केले नाही. हे म्हणणे खरे आहे की, जर चालकाकडे रायल्टी

असेल तर त्याच्याविरूध्द आम्ही केलेली कार्यवाई करता येत नाही.

**६.** हे म्हणणे खरे नाही की, मी दिनांक २९.१२.२०२४ रोजी पोलीस कर्मचाऱ्यांसोबत घटनास्थळी गेलो नव्हतो व तेथे आम्ही माझ्या सरतपासात सांगितल्याप्रमाणे ट्रॅक्टर थांबविला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, मी घटनास्थळी उक्त ट्रॅक्टर चालकास त्याचे नाव गाव, परवाना व वाहनाचे कागदपत्र विचारले नव्हते व त्याने त्याचे नाव राजेंद्र तसेच त्याच्याकडे परवाना व वाहनाचे कागदपत्र नसल्याचे सांगितले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, निशाणी क्र.८ वरील समंस मी पंचांना दिले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, निशाणी क्र.९ वरील घटनास्थळ व जप्ती पंचनामा मी तयार केला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपींविरूध्द खोटी फिर्याद दिली आहे. हे म्हणणे खरे नाही की, निशाणी क्र.२० व २१ वरील दस्त मी खोटे दाखल केले आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मी ट्रॅक्टर, ट्रॉली व एक ब्रॅस रेती जप्त केली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींना फसविण्यासाठी मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**
फेरतपास नाही.
सा.ब.वा.दा.ब.अ.क.के.
श्रवणोत्तर स्वीकृत.
मौदा.
दिनांक : १२.०५.२०२६

समक्ष,
स्वा/-
**(एन.के. वानखडे)**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, मौदा.